ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 5 | JANUARY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक व सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांचे राजकीय स्तरावरील यशापयश



प्रो. डॉ. विवेकानंद राजाराम माने
क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल
ता. पलूस जिल्हा. सांगली.

**प्रास्ताविक:**

भारतीय राज्यघटनेने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. लोकशाही शासनव्यवस्थेत सत्ता स्थापन करण्यासाठी निवडणुका हा एक अविभाज्य भाग असतो. स्वातंत्र्योत्तर काळात राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर इस. 1952 मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. भारतात प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वावर घेतली जाणारी ही पहिलीच सार्वत्रिक निवडणूक असल्याने या निवडणुकीत देशातील अनेक राजकीय पक्ष सामील झाले पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी लोकसभा व राज्य विधानसभांच्या निवडणुका एकत्रितच घेण्यात आल्या. 1951 मध्ये भाकपच्या शिष्टमंडळाने रशियातील साम्यवादी पक्षाचे प्रमुख जोसेफ स्टॅलीन यांची गुप्त भेट घेतली. या भेटीत भारतातील साहसवादी धोरण सोडून निवडणुकांना सामोरे जाण्याचा निर्णय घेण्यात आला भारतात झालेल्या सार्वत्रिक निवडणुकामध्ये डाव्या पक्षांनी सहभाग घेतला. महाराष्ट्रात शेकापच्या स्थापनेमुळे कॉंग्रेसला मोठे आव्हान निर्माण झाले. परंतु अंतर्गत दुफळीमुळे हा पक्ष दुभंगलासमाजवादी पक्षही या निवडणुकीत मोठ्या जोमाने उतरला होता. डाव्या पक्षात एकी न झाल्यामुळे त्याचा फायदा काग्रेस पक्षाला झाला.

**संशोधनाची उद्दिष्टे :** स्वातंत्र्योत्तर राजकीय पक्षांच्या कार्याचा आढावा घेणे
निवडणुकीतील डाव्या पक्षांचे सहभागाचे विश्लेषण करणे.
निवडणुकीतील डाव्या पक्षांचे यश आणि अपयश यांचे विश्लेषण करणे.

**संशोधनाची गृहीतके:** डाव्या पक्षांनी केलेल्या विविध आंदोलनाचा त्यांना निवडणुकीत फायदा झालाआहे.
डाव्या पक्षांतील वैचारिक मतभेदांमुळे त्यांच्यात दुही निर्माण झालीआहे.
डाव्या पक्षांतील मतभेदांचा फायदा विरोधी पक्षांना झाला आहे

**1952 ची सार्वत्रिक निवडणूक:**

1952 च्या सार्वत्रिक निवडणुकीत देशपातळीवर भाकपने कॉंग्रेसच्या खालोखाल संख्येने लोकसभेच्या जागा जिंकून नंबर दोनचा पक्ष म्हणून मान्यता मिळवली. परंतु मुंबई राज्यात पक्षाला अपयश आले मुंबई राज्यात भाकपने कामगार किसान पक्ष (का.कि.पक्ष) आणि समाजवादी पक्षातून फुटून निघालेल्या अरूणा आसफअली यांच्या नेतृत्वाखालीलडाव्यासमाजवादी गटाबरोबर निवडणूक आघाडी केली. तसेच शेकापबरोबर निवडणूक समझोता केला. परंतु मुंबई राज्यात पक्षाला अपयश आले 1952 च्या निवडणुकीत कॉंग्रेस सोडून सर्व डाव्या पक्षांची एकजुट करावी असे प्रयत्न चालू होते कॉंग्रेस पक्ष कमकुवत झाला असून कॉंग्रेसचा पराभव होणार असे कॉंग्रेसविरोधी

पक्षांनी ग्रहीत धरले. त्यामुळे 1952 च्या निवडणुका काँग्रेसविरोधी डाव्या पक्षांच्या तीन आघाड्या उभ्या राहिल्या. 1.समाजवादी व शेड्युल्ड कास्ट फेडरेशन. 2. डावे समाजवादी व का.कि.पक्ष. 3. शेकाप व कम्युनिस्ट पक्ष. काँग्रेसविरोधी या डाव्या पक्षांची मते विभागली जाऊन त्यांना अपयश आले.

## शे.का.पक्षातील मतभेदः

शेकापमध्ये आक्टोबर 1951 मध्ये दत्ता देशमुख, क्रांतिसिंह नाना पाटील, काकासाहेब वाघ आदी नेत्यांनाशेकापचा त्याग केला आणि 15 आक्टोबरला नवजीवन संघटनेसह का.कि.पक्ष या नावाचा स्वतंत्र पक्ष काढला. शेकापमध्ये अशा प्रकारे फूट पडल्याने सर्वसामान्य जनतेच्या पक्षाकडून असणाऱ्या आशा-आकांक्षा धुळीला मिळाल्या. अशातच स्वतंत्र भारताच्या इतिहासातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या. या निवडणुकीत नाना पाटील स्वतः उभे राहिले नाहीत परंतु ते आपल्या नव्याने स्थापन झालेल्या का.कि.पक्षाच्या उमेदवारांचा रात्रंदिवस प्रचार करू लागले तर शेकापतर्फे शंकरराव मोरे, केशवराव जेधे, तुळशीदास जाधव, र. के. खाडिलकर हे प्रचाराचे काम करू लागले. एकेकाळी एकमेकांची स्तुती करणारे नेते परस्परावर आरोपप्रत्यारोप करू लागले. त्यामुळे जनतेत संभ्रमावस्था निर्माण झाली. 1952 सालच्या निवडणुकीत शेकापचा दारुण पराभव झाला. का.कि.पक्षातील दत्ता देशमुख, व्ही एन. पाटील यांचेशी नाना पाटलांचे मतभेद होऊ लागले. दत्ता देशमुख व पक्षातील इतर क्रांतिसिंहाना भाषणात फक्त मार्क्सवादावरच बोला अशा सूचना करू लागले. त्यामुळे नाना पाटील का.कि.पक्षातून बाहेर पडले. त्यांनी विचारपूर्वक भाकपत जाण्याचा निर्णय घेतला. 1953 मध्ये आपल्या शेकडो कार्यकर्त्यासह त्यांनी भाकपमध्ये प्रवेश केला

## 1957 च्या सार्वत्रिक निवडणुकाः

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तुलनेत दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीवेळी डाव्या पक्षांना बरेच मोठे यश मिळाले संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सीमा लढा चळवळ या चळवळीच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक झाली. यावेळी काँग्रेस सोडून इतर सर्व पक्षांची संयुक्त महाराष्ट्र समिती (सं. म. समिती) स्थापन झाली. समितीने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्याने काँग्रेसला एक समर्थ पर्याय उभा राहिला. समितीमधील अनेक पक्षांच्या सहभागामुळे जागा वाटपाबाबत स्वाभाविकपणे खूप वादविवाद झाले सं. म. समितीत सहभागी झालेल्या पक्षात बरेच वैचारिक मतभेद होते. निवडणूकविषयक सहमतीच्या आड हे मतभेद काही प्रमाणात आले होते परंतु जनमताच्या दडपणामुळे त्यांना आपापसातील मतभेद बाजूला ठेवून निवडणूक लढविणे भाग पडले

1957 च्या सार्वत्रिक निवडणुका समितीच्या नावावर लढविण्यात आल्या. सं. म. समितीच्या वतीने एस. एम. जोशी, आचार्य अत्रे, क्रांतिसिंह नाना पाटील, एस. ए. डांगे इत्यादी नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारकार्यात मोलाची कामगिरी बजावली. संयुक्त महाराष्ट्र निर्माण न झाल्यामुळे जनता काँग्रेस पक्षावर रुष्ट झाली होती. तिच्या मनातील या असंतोषला वाचा फोडण्याचे कार्य समितीच्या नेत्यांनी केले. राजकारणात फारसे देणे-घेणे नसलेले सामान्य लोकही समितीच्या प्रचार कार्यात स्वयंस्फूर्तीने उतरले या काळात जनमत काँग्रेसच्या इतके विरोधात गेले होते की काँग्रेस पक्षाच्या नेत्यांना निवडणूक प्रचारासाठी राज्यात उजळ माथ्याने फिरणेही कठीण झाले. या निवडणुकीत समितीने काँग्रेस पक्षावर मात केली.

प. महाराष्ट्रात 133 जागांपैकी 101 जागा समितीने जिंकल्या तर काँग्रेसला केवळ 32 जागांवर समाधान मानावे लागले. मुंबईमध्ये 24 जागांपैकी 12 जागा समितीला तर 12 जागा काँग्रेसला मिळाल्या. मराठवाडा, विदर्भ याठिकाणी मात्र समितीला अपेक्षित यश मिळू शकले नाही. तेथे काँग्रेस पक्षाला जास्त जागा मिळाल्या. गुजरातमध्ये काँग्रेसला जादा जागा मिळाल्या. तेथील काँग्रेस आमदारांच्या मदतीने यशवंतराव चव्हाण हेच द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले

जानेवारी 1957 मध्ये होणाऱ्या आगामी निवडणुकीचे डावपेच व उमेदवार ठरविण्यासाठी द सातारा सांगली जिल्हा सं. म. समितीची बैठक 28 डिसेंबर 1956 रोजी सांगली येथे घेण्यात आली. या बैठकीत लोकसभेच्या जागेचा विचार होऊन शेकापचे श्री. बी. पी. पाटील यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली. विधानसभेसाठी 1) तासगाव- जी. डी. लाड. 2) शिराळा- वाय. सी. पाटील 3) वाळवा- नागनाथ रामचंद्र नायकवडी 4) खानापूर- भगवानराव पाटील. 5) मिरज-शिवराम घोलप (शे.का.फे.) 6) सांगली- माधव गोडबोले (जनसंघ) अशी नावे निश्चित करण्यात आली. समितीने जतचे राजेसाहेब विजयसिंह डफळे हे अपक्ष म्हणून निवडणुकीस उभे राहणार होते त्यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. कारण विजयसिंह डफळे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर मुंबई असेंब्लीचा राजीनामा दिला होता

शांताराम गरूड यांनी त्यांच्या 'माझी क्रांतिव्रताची साधना' या आत्मचरित्रात या कालखंडातील घडामोडींचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. ''गावोगावी प्रचार सभा, प्रसंगी मिरवणुका, कार्यकर्त्यांचे मेळावे, काही खास परिषदा अशी 1957 च्या निवडणुकीची कार्यपद्धती होती. अनेक लहानमोठ्या गावातून, खेड्यातून वाड्यावस्त्यावरुन सभा बैठकाघेवून समितीच्या भुमिकेचा प्रचार केला जात असे त्यासाठी शेकडो सभा आयोजित केल्या. ज्या गावात सभा असे त्या गावातील, भागातील तसेच तालुक्यातील कार्यकर्ते, पुढारी सभेत अग्रभागी असायचे. एकापाठोपाठ एक अशी सभांची मालिकाच चालू झाली जिल्ह्याच्या अगर महाराष्ट्राच्या पातळीवर पुढाऱ्याच्या सभाबाबत बातमी समजल्यावर कोणत्याही वेळी घरादारातील, शेतीवाडीतील कामे बाजूला ठेवून स्त्रीपुरूषांचे लोंढे दिवसा तसेच रात्री सभा ऐकण्यासाठी येत असत. या निवडणुकीत एस. ए. डांगे, एस. एम. जोशी, दत्ता देशमुख, माधवराव बागल, दादासाहेब गायकवाड, नाना पाटील यांचा राज्य पातळीवरील संच सर्वत्र संचार करत असे नाना पाटील ही एक वेगळीच व्यक्ती होती. अगदी सामान्यातील सामान्य व्यक्तीला प्रेरणा देण्याची शक्ती त्यांच्या वक्तव्यात होती यशवंतराव चव्हाण यांचा एकमेव अपवाद वगळताकाँग्रेसचे सारे मंत्री व नेते पराभूत झाले.''

सांगली जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीत मिरज मतदार संघातूनशे.का.पक्षाचे बळवंत उर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील हे विजयी झाले. काँग्रेस पक्षाचे विठ्ठल सखाराम पाटील हे पराभूत झाले. विधानसभेच्या निवडणुकीत तासगाव मतदार संघातून जी डी. बापू लाड यांनी काँग्रेसच्या दत्ताजीराव सुर्यवंशी यांचा पराभव केला विटा मतदारसंघातून भगवान नानासाहेब मोरे हे विजयी झाले वाळवा मतदारसंघातून नागनाथ नायकवडी यांनी काँग्रेसच्या एस डी. पाटील यांचा पराभव करून विजय मिळवला शिराळा मतदार संघातून वाय सी. पाटील यांनी काँग्रेसच्या राजारामबापू पाटील यांचा पराभव करून विजय मिळवला विजयी झालेले हे सर्व उमेदवार शेकापचे होते. मिरज मतदार संघातून शिवराम सखाराम घोलप हे शे.का.फे.चे उमेदवार विजयी झाले. अशा प्रकारे जिल्ह्यातील सात मतदारसंघापैकी पाच मतदारसंघात समितीचे सदस्य निवडून आले. निवडणुकीतील डाव्या पक्षांचे उमेदवार व त्यांना मिळालेली मते पुढीलप्रमाणे

सं. म. समितीतर्फे 1958 मध्ये शेकापचे कामगार नेते भगवानराव सुर्यवंशी यांची तसेच समाजवादी पक्षाचे गणपत कोळी याची मुंबई विधानपरिषदेवर 1958-1964 या काळासाठी निवड करण्यात आली. तसेच प्रा. एन. डी. पाटील यांची 1960 साली विधानपरिषदेवर निवड करण्यात आली.

## निष्कर्ष:

लोकशाही शासनव्यवस्थेत सत्ता स्थापन करण्यासाठी निवडणुका हा एक अविभाज्य भाग असतो. सयुंक्त महाराष्ट्र चळवळ आणि सीमा लढा चळवळ या चळवळीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस सोडून इतर सर्व पक्षांची संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली. 1957 च्या सार्वत्रिक निवडणुका समितीच्या नावावर लढविण्यात आल्या. जनता काँग्रेस पक्षावर नाराज झाली होती. तिच्या मनातील या असंतोषला वाचा फोडण्याचे कार्य समितीच्या नेत्यांनी केले निवडणुकीत पश्चिम महाराश्ट्रात 133 जागांपैकी 101 जागा समितीने जिंकून यश मिळविले.

## संदर्भ साधने

1) धर्माधिकारी भा. वि., क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी गौरव समिती वाळवे, 2007.
2) यादव सुमीत, क्रांतिसिंह नाना पाटील-जीवन व कार्य, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा, 2011.
3) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सहा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 1991.
4) इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया, जनरल इलेक्शन 1951
5) इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया, बॉम्बे लेजिस्लेटिव्ह असेंब्ली इलेक्शन 1951